रहेमानीया सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), बीड, ता.जि.बीड या संस्थेचे अतिरिक्त क्षेत्र गहाणखतातुन मुक्त करून इतरांना हस्तांतरण / विक्री करण्यास परवानगी देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

शासन निर्णय क्रमांक :-भुखंड - २५२५/ प्र.क्र.१२८५/१९स,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : २१ जुलै, २०२६.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एचएसजी-२८०७/प्र.क्र.५१९/पहिला/१८-स, दि.१४.१२.२००७.

२) शासन निर्णय क्र. एचएसजी- २८०७/प्र.क्र.५१९/दुसरा/१८-स,दि.२०.०३.२००९

३) शासन निर्णय क्र. एचएसजी-२८०७/प्र.क्र.५१९/दुसरा (२)/१८-स,दि.२२.०९.२००९

४) शासन निर्णय क्र. एचएसजी-२८०७/प्र.क्र.५१९/दुसरा (३)/१८-स,दि.२६.०३.२०१०

५) शासन निर्णय क्र. एचएसजी-२८०७/प्र.क्र.५१९/दुसरा (४)/१८-स,दि.३१.०३.२०११

६) शासन निर्णय क्र. एचएसजी-२८०७/प्र.क्र.५१९/१८-स/ सुधारीत /१८स,दि.१२.०७.२०१३

७) संस्थेचा दिनांक ०७.०७.२०२५ व दिनांक ०६.०५.२०२६ रोजीचा प्रस्ताव.

८) उप निबंधक सहकारी संस्था, ता.जि.बीड यांचा जा.क्र.उपनि/ गृहनिर्माण / घबांक / भु.गहाण.ख.मुक्त/ प्रस्ताव/ २०२६, दिनांक १७.०३.२०२६ रोजीचा अहवाल.

प्रस्तावना :-

राज्य शासकीय / जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना घरबांधणी कर्ज या योजनेंतर्गत रहेमानीया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बीड, ता.जि.बीड या संस्थेने ६३ सभासदांच्या कर्ज मंजूरीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्यापैकी, ४० पात्र सभासदांना संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक १,२,३,४, व ५ अन्वये एकूण रुपये १,१३,१२,९८०/- इतके कर्ज वितरीत करण्यात आले होते.

संस्थेने कर्ज मंजूरी प्रस्तावासोबत मौजे आनंदवाडी, ता.जि.बीड येथील गट क्र.९६ मधील २१११.८४ चौ.मी. क्षेत्राचे गहाणखत सादर केले होते. संस्थेने कर्ज मंजूर / वितरीत झालेल्या पात्र सभासदांकरीता सदर क्षेत्रापैकी प्लॉट क्र. ३ मधील ४१०.२९ चौ.मि. या क्षेत्रावर एकूण २२ फ्लॅट व प्लॉट क्र. ४ मधील ३८०.६४ चौ.मि. या क्षेत्रावर १४ फ्लॅट असे एकूण ३६ सदनिकांचे बांधकाम केले असून, पात्र ४० सभासदांपैकी ४ सभासदांनी राजीनामा दिलेला आहे. राजीनामा दिलेल्या ४ सभासदांना वितरीत केलेले कर्ज व त्यावरील व्याजाचा भरणा संस्थेने शासनखाती केला आहे. संस्थेने संस्थेच्या उर्वरित क्षेत्रापैकी प्लॉट क्र. १ चे क्षेत्रफळ ४७८.६४ चौ.मि., प्लॉट क्र.२ चे क्षेत्रफळ ४१०.२२ चौ.मि., प्लॉट क्र.५ चे क्षेत्रफळ ४३२.०५ चौ.मि. असे एकूण १३२०.९१ चौ.मि.क्षेत्रावर बांधकाम करण्यात आले नसून सदर क्षेत्र गहाणखतातून वगळण्याची विनंती संस्थेने केली आहे. यास्तव, संस्थेचे अतिरिक्त क्षेत्र गहाणखतातून मुक्त करण्यासंदर्भात संदर्भ क्रमांक ७ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

रहेमानीया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बीड, ता.जि.बीड या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकीचा शासनाकडे गहाण असलेल्या गट क्रमांक ९६ वरील (प्लॉट क्र.१, २ ,३ ,४ व ५) एकूण २१११.८४ चौ.मी. क्षेत्रापैकी, प्लॉट क्र. १ चे क्षेत्रफळ ४७८.६४ चौ.मि., प्लॉट क्र.२ चे क्षेत्रफळ ४१०.२२ चौ.मि., प्लॉट क्र.५ चे क्षेत्रफळ ४३२.०५ चौ.मि.असे एकूण १३२०.९१ चौ.मि. क्षेत्रावर बांधकाम करण्यात आले नसल्याने सदर क्षेत्रावर भविष्यात राज्य शासकीय / जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना घरबांधणी कर्ज या योजनेंतर्गत शासनाकडून घरबांधणी कर्ज मंजूर केले जाणार नाही, या अटीच्या अधीन राहून गहाणखतातून वगळण्यास व इतरांना हस्तांतरण / विक्री करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०७२११६१९५१५७४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYA DHUNDAPPA
SANGSHETTI

Digitally signed by VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=f8392d872b7180812a91876993d519e95c3e41444d8d93ecaac6a9b51c69838f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C0422C17B24964BFB1F10270074369C4888C02315C6A4C050EAA332B556F90EA, cn=VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
Date: 2026.07.21 16:21:59 +05'30'

(विजया संगशेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई-०१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती)
२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य नागपूर-०२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती)
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) संचालक, विमा संचालनालय, मुंबई गृहनिर्माण भवन (म्हाडा) खोली क्र. २६४, पहिला मजला, बांद्रे (पुर्व) ४०० ०५१.
७) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जि.बीड.
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, जि.बीड.
९) जिल्हा विशेष, लेखापरिक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, बीड.
१०) उप निबंधक, सहकारी संस्था, ता. जि.बीड.
११) अध्यक्ष, रहेमानीया सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.,बीड, ता.जि.बीड.
१२) निवडनस्ती कार्यासन १९स.